# अध्यक्षांचे मनोगत



सन्माननीय सभासद बंधु-भगिनिंनो,

आपल्या दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँकेचे संस्थापक व संतश्रेष्ठ गाडगे महाराजांचे परमशिष्य **ह.भ.प.वै.दत्तात्रय महाराज कळंबे,** प्रदिर्घ कालावधीकरीता बँकेचे मार्गदर्शक राहीलेले सातारा जिल्ह्याचे जेष्ठ नेते, थोर स्वातंत्र्यसेनानी **स्व.भिलारे गुरूजी,** महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार **स्व.यशवंतराव चव्हाण,** माथाडी कामगारांचे दैवत **स्व.आण्णासाहेब पाटील** यांच्या पवित्र स्मृतींना त्रिवार अभिवादन करून बँकेच्या ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या सर्व सभासद बंधू-भगिनींचे बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने मी सर्वप्रथम हार्दिक स्वागत करतो. आपल्या बँकेच्या सर्वांगीण विकासाकरीता सातत्यपूर्ण मार्गदर्शन करणारे **मा.छ.उदयनराजे भासेले**-विद्यमान खासदार सातारा, **मा.आनंदराव अडसुळ**-मा.केंद्रिय अर्थराज्यमंत्री व मा.खासदार अमरावती, **मा.नरेंद्र पाटील**-सरचिटणीस-माथाडी कामगार युनियन, अध्यक्ष-आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ,**मा.शशिकांत शिंदे**-विद्यमान आमदार कोरेगांव, **मा.शिवेंद्रसिंहराजे भोसले**-विद्यमान आमदार जावली-सातारा, **मा.मकरंद पाटील(आबा)**-विद्यमान आमदार वाई-महाबळेश्वर-खंडाळा, बँकेचे प्रमुख मार्गदर्शक व सातारा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष **मा. वसंतराव मानकुमरे,** माझे सहकारी संचालक व व्हाईसचेअरमन **मा.श्री.प्रकाश मस्कर,** आपल्या बँकेचे माजी चेअरमन व सभागृहाचे नेते **मा.विक्रम भिलारे,** माझ्यासोबत कार्यरत असणारे माझे सर्व सहकारी संचालक यांचे अहवाल वर्षामध्ये मोलाचे सहकार्य प्राप्त झालेले असल्यामुळेच बँकेची समाधानकारक प्रगती झालेली असल्याचा मी या ठिकाणी आवर्जून उल्लेख करतो. बँकेबद्दल आत्मीयता असलेले बँकेचे असंख्य खातेदार, ठेवीदार, सभासद, हितचिंतकांनी व मान्यवरांनी केलेले अमुल्य मार्गदर्शन, सहकार क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या विविध आर्थिक संस्था, कामगार संघटना, शैक्षणिक व सामाजिक संस्थांचे लाभलेले सहकार्य व पाठबळावरच आपल्या बँकेला अहवाल वर्षामध्ये बँकींग व्यवसायामध्ये प्रभावीपणे प्रगती साधता आलेली असल्याने बँकेचा चेअरमन या नात्याने या सर्वांप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो.

अहवाल वर्षात केंद्र सरकारने बँकिंग व्यवसायास समाधानकारकरित्या भांडवल पुरवठा केलेला असून बँकांच्या अनुत्पादीत कर्जांचीही समाधानकारक वसुली झालेली आहे. बँकांद्वारे कर्जपुरठ्यात समाधानकारक वाढ करण्यात आल्याने व ग्राहक सेवांच्या विस्तारीकरणांमुळे बँकांच्या आर्थिक स्थितीमध्ये अमुलाग्र सुधारणा घडून आलेल्या आहेत. अहवाल वर्षामध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे बँकिंग व्यवसायातील धोक्यांचे योग्य स्वरूपात व्यवस्थापन केले गेल्याने बँकिंग व्यवसाय हा सुनियंत्रीत राहिलेला आहे. गतसाली भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ ही जगातील इतर अर्थव्यवस्थेच्या तुलनेत अत्यंत समाधानकारक राहीलेली असुन जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अर्थतज्ज्ञांनी भारतीय अर्थव्यवस्थेची प्रशंसा केलेली असुन आपला देश हा विकसनशिल देशांध्ये नजीकच्या काळात अग्रभागी राहणार असल्याचे वक्तव्य केलेले आहे. आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या चौथ्या तिमाहीत आपल्या देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा दर (GDP) हा ७.२% तर कृषी क्षेत्राच्या विकासाचा दर ४% इतका राहिलेला आहे. जागतीक बँकेद्वारे आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये भारताचा सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा दर ७.५% पर्यंत वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. येत्या एक ते दोन वर्षात भारत ही जगातील सर्वात वेगाने वाटचाल करणारी अर्थव्यवस्था ठरणार आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेस अपेक्षित असलेले बँकिंग व्यवसायातील सक्षम स्वरूपातील बँकांचे पर्याय म्हणून अहवाल वर्षामध्ये काही राष्ट्रीयकृत बँकानी विलीनीकरणाचे धोरण स्विकारलेले आहे. सदर बाबीमुळे नजीकच्या कालावधीत बँकांची संख्या ही कमी होत जाणार आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे विकास आणि नियामक धोरणांतर्गत सक्षम नागरी बँकांना स्वेच्छेने स्मॉल फायनान्स बँकांमध्ये स्थित्यंतर करण्याबाबत अलिकडे मार्गदर्शक तत्वे प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. सप्टेंबर

२०१८ पासून भारत सरकारची इंडियन पोस्ट पेमेंट बँक भारतातील ६५० जिल्ह्यांत कार्यान्वीत झालेली असून सदर बँकेद्वारे खेड्यापाड्यांतील सर्वसामान्य माणूस हा बँकिंग व्यवहारांशी जोडला गेला आहे. अहवाल वर्षामध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेने बिगर-बँकींग वित्तीय संस्थांना ( NBFCs) पेमेंट बँकांचे तसेच स्मॉल सेव्हिंग बँकांचे परवाने प्रदान केलेले असल्यामुळे बँकिंग व्यवसायामध्ये दिवसेंदिवस स्पर्धा ही वाढतच चाललेली आहे. अहवाल वर्षात आपल्या बँकेने अत्याधुनिक तंत्रज्ञान व व्यवसायीक दृष्टीकोन यांचा अंगीकार करून भारतीय रिझर्व्ह बँक आणि सहकार खात्यांच्या मागदर्शक धोरणांची सातत्यपुर्ण काटेकोरपणे अंमलबजावणी केलेली आहे. अहवाल वर्षात आपल्या बँकेने सामाजिक जबाबदारीचे भान राखत सर्वसामान्य ग्राहकालाच बँकेच्या विकासाचा केंद्रबिंदू मानून त्यांचे आर्थिक गरजांचा साकल्याने अभ्यास करून विविध विकासाभिमुख योजना कार्यान्वित करण्याचे प्रयत्न साधलेले आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार अगामी कालावधीत आपल्या बँकेद्वारे बँकींग हे तळागाळातील सर्व सामान्य माणसांपर्यंत पोहचविण्याबातचे धोरण (Policy for Financial Inclusion) प्रभावीपणे राबविले जाणार आहे.

बँकेच्या संचालक मंडळाव्दारे बँकेशी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्तापित असलेला बँकेचा पारंपरिक ग्राहक बँकेपासून कधीही दुरावणार नाही याची सातत्यपुर्ण दक्षता घेण्यात आलेली आहे. बँकेच्या संचालक मंडळामध्ये कार्यरत असलेले माझे सर्व सहकारी संचालक हे बँक ग्राहकांच्या आर्थिक विकासाची तळमळ असलेले, सहकार, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणारे उच्च-शिक्षीत व व्यवसायिक सदस्य असुन या सर्वांचा बँकेच्या सर्वांगिण विकासाचा दृष्टीकोन हा सातत्यपूर्ण सकारात्मक स्वरूपाचा असतो. अहवाल वर्षामध्ये बँकेच्या संचालक मंडळाचे कामकाज अधिकाधिक प्रभावी होण्यासाठी बँकेचे माजी सरव्यवस्थापक व संचालक मंडळाचे सल्लागार श्री मधुकर चव्हाण यांनी केलेले मार्गदर्शन व संचालक मंडळाने आखलेली धोरणे ही अत्यंत उपयुक्त ठरलेली आहेत. आपली बँक प्रदान करीत असलेल्या विविध बँकींग सेवा-सुविधांच्या माध्यमातून आपल्या ग्राहकांची आर्थिक उन्नती ही अत्यंत प्रभावीपणे साधली गेलेली असून सदर उन्नतीमध्ये बँकेचे संस्थापक ह.भ.प.वै.दत्तात्रय महाराज कळंबे यांचीच दुरदृष्टी सामावलेली आहे याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. माझे सर्व सहकारी संचालक सदस्य, सर्व श्रेणींचे अधिकारी व सेवक वर्गाचे अथक परिश्रमातून ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने खालीलप्रमाणे आर्थिक प्रगती साधलेली आहे.

(₹ In Crs)

| अ.क्र. | तपशील | ३१ मार्च २०१८ अखेर | ३१ मार्च २०१९ अखेर | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १ | स्वनिधी (Owned Fund) | ९१.६१ | ९७.०५ | ५.४४ |
| २ | ठेवी (Deposits) | ६६४.४५ | ७३३.१२ | ६८.६७ |
| ३ | कर्जे (Advances) | ४४५.५८ | ४७६.११ | ३०.५३ |
| ४ | एकुण संमीश्र व्यवसाय (Total Business Mix) | १११०.०३ | १२०९.२३ | ९९.२० |
| ५ | गुंतवणुक (Investments) | २६५.४५ | ३०२.३८ | ३६.९३ |
| ६ | खेळते भांडवल (Working Capital) | ८०६.२४ | ८७७.५७ | ७१.३३ |
| ७ | निव्वळ नफा (Net Peofit) | ५.२१ | ५.८६ | ०.६५ |
| ८ | Networth | ५५.९५ | ५८.४७ | २.५२ |
| ९ | ऑडिट वर्ग | "A" | "A" | |

बँकेच्या ग्राहक वर्गाचा बँकेवरील विश्वास हा दिवसेंदिवस वृध्दींगत होत आहे. अहवाल वर्षात आपल्या बँकेने रू.७००.०० कोटी इतक्या ठेवींचा टप्पा पार केलेला असून आपल्या बँकेकरीता सदर बाब अत्यंत भूषणावह अशी आहे. बँकेच्या ठेवीमध्ये त्याचप्रमाणे व्यवसायामध्ये होत असलेल्या वाढीमुळे नजीकच्या कालावधीत आपली बँक सहकारी बँकांमध्ये अग्रभागी राहण्याकरीता बँकेस **शेड्युल्ड बँकेचा** दर्जा प्राप्त करून घेण्याकरीता आवश्यक असलेल्या निकषांची पुर्तता करण्याचे संचालक मंडळाचे धोरण आहे. संचालक मंडळाच्या या धोरणाच्या अंमलबजावणीकरीता आपणा सर्वांच्या सहभागाची अपेक्षा आहे.

अहवाल वर्षामध्ये आपल्या बँकेने सर्वच आघाड्यांवर समाधानकारक प्रगती साधलेली असुन बँकेने आपल्याकडील निधींचे कर्जे व गुंतवणुकींचे माध्यमातून योग्य प्रकारे व्यवस्थापन केलेले आहे. अहवाल वर्षामध्ये बँकेच्या कारभारात सर्व प्रकारची पारदर्शकता राखण्यात आलेली असुन बँकेने भारतीय रिझर्व्ह बँकेस अभिप्रेत असलेल्या आर्थिक दृष्ट्या सक्षम व सुयोग्य व्यवस्थापन असलेल्या नागरी सहकारी बँकांबाबतच्या (FSWM UCBs ) सक्षमतेच्या सर्व कसोट्या पूर्ण केलेल्या आहेत. अहवाल वर्षामध्ये आपल्या बँकेने ग्राहकाभिमुख बँकींग सेवा-सुविधा प्रदान करण्याचे धोरणांतर्गत आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाअधिक वापर, कर्मचारी वर्गाची कार्यक्षमता वाढविण्याचे प्रयत्न करून विविध स्वरूपाच्या महसुली खर्चामध्ये बचत करण्याचे प्रयत्न साधलेले आहेत. अहवाल वर्षामध्ये बँकेने ठेवींवरील व्याज खर्चावर नियंत्रण प्रस्थापीत करून

सुरक्षीत स्वरूपाच्या कर्ज वितरणावर भर दिलेला आहे. बँकेच्या कर्जवसुली विभागाद्वारे अनुत्पादित कर्ज वसुलीचा नियोजनबध्द कार्यक्रम राबवुन प्रदिर्घ कालावधीपासून अनुत्पादित असलेली कर्जे वसुल करण्याचे प्रयत्न साधलेले आहेत. अहवाल वर्षामध्ये सरकारी कर्ज रोखे खरेदी-विक्री व्यवहारांच्या सुलभतेकरीता क्लिअरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.(CCIL) चे सभासदत्व प्राप्त करून घेण्यात आलेले असून नजीकच्या कालावधीमध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेच्या Negotiated Dealing System-OMS चे सभासदत्व प्राप्त करून थेट स्वरूपातील व्यवहारांद्वारे बँकेच्या नफा क्षमतेमध्ये वाढ करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत.

आपल्या बँकेने बँकेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या २४ शाखा तसेच बँकेच्या २३ शाखांमध्ये कार्यान्वीत असलेल्या ऑन साईट ए टी एम सुविधांव्दारे सी बी एस कार्यप्रणाली अंतर्गत बँक खातेदारांना अत्याधुनिक बँकींग सेवा-सुविधा प्रदान करण्याचे प्रयत्न साधलेले असुन समस्त खातेदारांना Rupay Debit Card च्या माध्यमातून PoS, RTGS/NEFT यांसारख्या सुविधा थेट स्वरूपात प्रदान करण्यात येत असतात. आपल्या बँकेने अलिकडेच IMPS सेवाही कार्यान्वित केलेली असुन टाटा कम्युनिकेशन ॲन्ड पेमेंट सोल्युशन प्रा.लि. यांचेशी करण्यात आलेल्या सहकार्य करारातंर्गत आपल्या बँकेच्या नावाचा ब्रॅंड हा जास्तीत जास्त प्रसिध्द होण्यासाठी ज्या विभागांमध्ये आपल्या बँकेच्या शाखा उपलब्ध नाहीत अशा विभागांत बँक ग्राहकांच्या सेवांकरिता TATAINDICASH ची चार एटीएम सेंटर कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. सदर सुविधांद्वारे आपल्या बँकेच्या ग्राहकांनी TATAINDICASH च्या ए टी एम मधून केलेले व्यवहार विनाशुल्क स्वरूपाचे असतात. सदर स्वरूपाच्या करारातंर्गत अगामी कालावधीत बँकेच्या ब्रँडद्वारे जास्तीतजास्त एटीएम कार्यान्वीत करण्याचा बँकेचा मानस आहे. अहवाल वर्षामध्ये आपल्या बँकेने सायबर सुरक्षीततेअंतर्गत निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांचे व्यवस्थापनाकरिता प्रभावी यंत्रणा कार्यान्वीत केलेली असुन अगामी कालावधीत मोबाईल व इंटरनेट बँकींग सेवा कार्यान्वीत करणे, बँक ग्राहकांना अधिकाधिक तंत्रज्ञानयुक्त सेवा प्रदान करणे व स्पर्धेला सामारे जाणे हे बँकेचे धोरण आहे. बँकेद्वारे आपल्या खातेदारांना डिजीटल व्यवहार करण्याचे पर्याय हे व्यापक स्वरूपात विकसीत करण्यात आलेले आहेत. अहवाल वर्षात आपल्या बँकेने बँकेत्तर व्यवसायांतर्गत खातेदार-सभासदांना जीवन विमा, जनरल विमा, प्रधानमंत्री जीवन ज्योत विमा योजना त्याचप्रमाणे पॅनकार्ड प्रदान करण्याबाबतच्या सुविधा समाधानकारकपणे प्रदान केलेल्या आहेत.

बँकेच्या संचालक मंडळाने आगामी कालावधीत करावयाच्या बँकेच्या विकासाचे निश्चित असे धोरण (Road Map) तयार केलेले असुन त्याचे अंमलबजावणी करीता संचालक मंडळ कटीबध्द आहे. बँकेच्या ग्राहकांना विनासायास व दर्जेदार स्वरूपात सेवा सुविधा प्रदान करण्याकरीता बँकेच्या **दादर (पश्चीम)** शाखेचे अत्याधुनिक सेवासुविधांसह कार्यान्वित केलेल्या नवीन जागेत अलिकडेच स्थलांतर करण्यात आलेले आहे. बँकेच्या शाखांच्या व्यवसायात समाधानकारक वाढ साधण्यासाठी बँकेच्या **मालाड व विक्रोळी (पुर्व)** या दोन शाखाही नजीकच्या काळात अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्याचे धोरण आहे. आपल्या बँकेने अहवाल वर्षामध्ये बँकेच्या **घाटकोपर (पुर्व) व कल्याण (पुर्व)** या शाखांना मान्यता मिळविण्याकरीता भारतीय रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव दाखल करण्यात आलेले असुन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या शाखा विस्ताराबाबतचे धोरणांनुसार बँकेच्या जास्तीत जास्त शाखा विस्तारीत करण्याचे संचालक मंडळाचे धोरण आहे.

आपणांस ज्ञातच आहे की आपल्या दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँकेची निर्मिती ही सन १९७३ च्या सुमारास एक लाख इतक्या अल्पशः भांडवलातुन व कष्टकरी कामगार वर्गाच्या सहभागातुन संस्थापक ह.भ.प.वै.दत्तात्रय महाराज कळंबे यांनी साधलेली आहे. आपल्या बँकेच्या निर्मितीमुळे कष्टकरी कामगार वर्गाचा आर्थिक स्तर उंचावलेला आहे. बँकेची जणमाणसांतील प्रतीमा ही एका थोर महात्म्याची बँक अशीच असुन बँकेची जणमाणसांत असलेली ही प्रतिमा चिरंतर राखण्याकरीता आपणां सर्वांचे सदैव प्रयत्न असतात. बहुजन समाजाला ह.भ.प.वै.दत्तात्रय महाराज कळंबे यांच्या सारख्या थोर महात्म्याचे चिरंतर स्मरण होण्यासाठी आपल्या बँकेच्या माध्यमातुन वेळोवेळी विविध धार्मिक, सामाजिक, शैक्षणीक व क्रिडा विषयक कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांच्या कार्याचा उचीत स्वरूपात गौरव होत असतो. ह.भ.प.वै.दत्तात्रय महाराज कळंबे यांच्या वैकुंठगमना नंतर त्यांचे प्रदिर्घ कालावधीकरीता वास्तव्य राहीलेल्या जावली तालुक्यातील बेलोशी गावामध्ये असलेल्या समाधी मंदिरास आर्थिक, सामाजिक, राजकिय व धार्मिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अनेक प्रतिष्ठित व्यक्ती वारंवार भेट देत असतात. सदर समाधी मंदीर हे आपल्या बँकेचे प्रेरणास्थान असुन मंदीराचे पावित्र्य जतन करण्याकरिता अहवाल वर्षामध्ये नुतनीकरन व सुशोभिकरन करण्यात आलेले आहे. सदर वास्तु ही आपल्या बँकेप्रमाणेच समस्त समाज बांधवांचे शक्तीस्थळ ठरावे हीच सदिच्छा !!

आपल्या बँकेची सुवर्ण महोत्सवाकडेही वाटचाल चालू असुन बँकेचे संस्थापक **ह.भ.प.वै.दत्तात्रय महाराज कळंबे** यांच्या दुरदृष्टीतुन निर्माण झालेल्या या आपल्या जिव्हाळ्याच्या बँकेच्या सर्वांगीण विकासाकरीता आपणांद्वारे सातत्यपुर्ण योगदान प्रदान करण्यासाठी तसेच बँकेच्या माध्यमातुन सर्वसामान्य माणसाचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासाचा स्तर उंचावण्यासाठी आपण सदैव आमच्या सोबत कार्यरत राहण्यासाठी मी आपणांस नम्र विनंती करतो.

**जय हिंद, जय सहकार !**

आपला स्नेहांकित
**श्री.चंद्रकांत रावसाहेब गावडे**

# FINANCIAL HIGHLIGHTS AS AT 31ST MARCH, 2019

₹ In Crs

| Particulars | As at 31.03.2019 | As at 31.03.2018 |
|---|---|---|
| Paid up Share Capital | 20.12 | 18.77 |
| Reserves & Other Funds | 76.93 | 72.84 |
| Total Owned Funds | 97.05 | 91.61 |
| **Net Worth** | **58.47** | **55.95** |

| Particulars | As at 31.03.2019 | As at 31.03.2018 |
|---|---|---|
| No. of Branches | 24 | 24 |
| Regular Members | 49050 | 47858 |
| Nominal Members | 3460 | 3793 |
| Audit Classification | "A" | "A" |
| Staff Strength | 219 | 225 |




Financials

₹ In Crs

| Particulars | As at 31.03.2019 | As at 31.03.2018 |
|---|---|---|
| Capital Adequacy Ratio (CRAR) | 17.03% | 17.22 % |
| **Deposits** | | |
| Saviings | 186.51 | 185.87 |
| Current | 43.23 | 40.24 |
| Term | 503.38 | 438.34 |
| **Total** | **733.12** | **664.45** |
| **Advances** | | |
| Secured | 452.30 | 425.47 |
| Unsecured | 23.81 | 20.11 |
| **Total** | **476.11** | **445.58** |
| **Investments :** | 302.38 | 265.45 |
| **Profit for the Year** | 5.85 | 5.21 |
| **Working Capital** | 877.57 | 806.24 |



# FINANCIAL GRAPHS

Rs. In Crores

## DEPOSITS




## ADVANCES




## TOTAL BUSINESS MIX




## RESERVES & SURPLUS




## WORKING CAPITAL




## BUSINESS PER EMPLOYEE




## INCOME




## OPERATING PROFIT



## ◆ प्रशासन ◆

**श्री.सोनुदास आत्माराम नाईक**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**श्री.लक्ष्मण शंकर रांजणे**
सरव्यवस्थापक

## ◆ सहाय्यक सरव्यस्थापक ◆

**श्री मानसिंग भिकु निकम**
**श्री गिरीष साहेबराव जाधव**
**श्री शिवाजी पांडुरंग बेलोशे**
**श्री बाजीराव विठ्ठल धनावडे**

## ◆ संचालक मंडळ सल्लागार ◆

**श्री मधुकर शंकरराव चव्हाण**

---

## ◆ वैधानिक लेखापरिक्षक ◆

**गोन्साल्वीस ॲन्ड असोसिएटस्**
**चार्टर्ड अकौंटंट**

---

## ◆ टॅक्स ऑडिटर्स ◆

**मे.व्ही.आर समदारीया ॲन्ड कं.**
चार्टर्ड अकौंटंट

## ◆ जी एस टी ऑडिटर्स ◆

**मे सुविश्व व्हॅल्युअर्स ॲन्ड कन्सलटंट प्रा.लि.,**
चार्टर्ड अकौंटंट

## ◆ समावर्ती लेखापरिक्षक ◆

**मे.दिनेश आहिर ॲन्ड कं.,**
चार्टर्ड अकौंटंट

**मे.तेजस नाडकर्णी ॲन्डअसोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंट

**मे.एस ए मोरे ॲन्ड कं.**
चार्टर्ड अकौंटंट

**मे ऋषीकेश वांगडे ॲन्ड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंट

**मे.किरण भोसले ॲन्ड कं.,**
चार्टर्ड अकौंटंट

**मे.नितीन दळवी ॲन्ड कं.,**
चार्टर्ड अकौंटंट

---

**मे.मार्क ॲन्ड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंट
(IS Auditors)

## बँकर्स

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
स्टेट बँक ऑफ इंडिया
बँक ऑफ बडोदा

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
बँक ऑफ महाराष्ट्र
एच डी एफ सी बँक लि.,

मुंबई जिल्हा मध्य सह बँक लि.,
आय डी बी आय बँक
येस बँक लि.,

सातारा जिल्हा मध्य.सह.बँक लि.
पंजाब नॅशनल बँक
आय सी आय सी आय बँक लि.,

## कॉर्पोरेट एजन्सीज

विमा व्यवसाय : आय सी आय सी आय लोंबार्ड इन्शुरंन्स कं.लि., रॉयल सुंदरम जीवन विमा कं.लि.,
पॅनकार्ड : यु टी आय इन्फ्रास्ट्रक्चर ॲन्ड सर्व्हीसेस लि., (UTIITSL)

**DMK JAOLI BANK**
**दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि.**
(नोंदणी क्रं. बी. ओ. एम./बी.एन.के./ १२७ ऑफ १९७३)
**प्रशासकीय कार्यालय :** ४१८/२०/२२, मौलाना आझाद रोड, मुंबई.– ४०० ००४. दुरध्वनी क्र.: +९१ २२–२३८७०४३७/२३८२२७७७
फॅक्स : +९१ २२–२३८५०५१४
Website : www.jaolibank.in Email : hoadmin@jaolibank.in, hoaccounts@jaolibank.in

# सेहचाळीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरीता)**

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ३०.०६.२०१९ रोजी सकाळी ठिक १०.०० वा. **शिवास्वामी ऑडीटोरियम ऑफ द फाईन आर्ट सोसायटी, दुसरा मजला,फाईन आर्ट चौक, चेंबुर मोनो रेल्वे स्टेशन जवळ, आर.सी.मार्ग, चेंबुर (पु) मुंबई ४०० ०७१** येथे संपन्न होणार आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती.

## सभेपुढील विषय

१ दिनांक ५ ऑगस्ट, २०१८ रोजी झालेल्या ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दिनांक ३१ मार्च, २०१९ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रकाचे वाचन करून त्यास स्विकृती देणे.
३. वैधानिक लेखापरिक्षकांचा सन २०१८-१९ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरूस्ती अहवालाची (Compliance Report) नोंद घेणे.
४. सन २०१८-१९ सालच्या नफा विभागणीच्या अनुषंगाने बँक संस्थापक वै.ह.भ.प.दत्तात्रय महाराज कळंबे यांचे कार्य प्रसार निधीअंतर्गत नफा वर्ग करण्यास मान्यता देणे.
५. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०१८-१९ सालच्या नफा विभागणीस मान्यता देणे.
६. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
७. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०१९-२० या आर्थीक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे.
८. वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली संशयीत व बुडीत कर्जे येणे बाकी रक्कम संबंधीत कर्जदारांकडून करावयाच्या वसुलीचे सर्व अधिकार अबाधित ठेवून निर्लेखन करण्यास मान्यता देणे.
९. संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार बँकेच्या उपविधीचे (Bye-Law) कलम १५ दुरूस्तीस मान्यता देणे (प्रस्तावित उपविधीतील कलम १५ चे दुरूस्तीचा मसुदा अहवालाचे पान क्र.४३ वर देण्यात आलेला आहे.)
१०. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या रजेस मान्यता देणे.
११. मा.अध्यक्षांचे परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

मुंबई
दिनांक : ०९.०६.२०१९

संचालक मंडळाचे संमतीने
श्री.एस.ए.नाईक
मुख्य कार्यकारी अधिकारी

१. गणसंख्येपूर्ती अभावी सभा तहकूब करावी लागल्यास सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर म्हणजेच सकाळी ठीक १०.३० वाजता सुरू होईल व त्या सभेच्या कामकाजाच्यावेळी गणसंख्यापूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरळीत होण्यासाठी ज्या सभासदांना अहवालासंबंधी काही विधायक स्वरूपाची माहिती विचारावयाची असल्यास त्यांनी त्यासंबंधी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सभेच्या तारखेपूर्वी किमान सात दिवस अगोदर लेखी कळवावे.
३. बँकेच्या वार्षिक अहवालाची प्रत www.jaolibank.in या बँकेच्या वेबसाईटवर व सर्व शाखांत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

# संचालक मंडळाचा अहवाल

**सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

आपल्या बँकेने अहवाल वर्षात बँकिंग व्यवसायामध्ये वेळोवेळी विकसीत होत जाणारे तंत्रज्ञान, धोक्यांचे व्यवस्थापन, ग्राहकाभिमुखता, सामाजिक बांधिलकी यांना सर्वोच्च प्राधान्य देत व्यवसायामध्ये समाधानकारक प्रगती साधलेली असल्याने बँकेचा ३१ मार्च, २०१९ अखेरचा ताळेबंद, नफातोटा पत्रक, कॅश फ्लो बाबतचे माहितीपत्रक आणि वैधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल बँकेच्या संचालक मंडळाचे वतीने आपणांसमोर सादर करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

**बँकेचे कार्यक्षेत्र व शाखा विस्तार :**

आपल्या बँकेचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र असे असुन बँकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्राहकांना विविध स्वरूपाच्या बॅकिंग सेवा-सुविधा प्रदान करण्याचे सातत्याने प्रयत्न करण्यात येतात. बँकेच्या कार्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या २४ शाखा या कोअर-बँकिंग सोल्युशन कार्यप्रणालीअंतर्गत कार्यान्वित करण्यात आलेल्या असल्याने समस्त खातेदारांना बँकेच्या कोणत्याही शाखेच्या माध्यमातुन आपल्या खात्यांवर विविध स्वरूपाच्या बँकिंग सेवा-सुविधा प्राप्त करून घेण्याच्या सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. बँकेच्या शाखा विस्ताराबाबतचे धोरणांनुसार बँकेच्या जास्तीत जास्त शाखा विस्तारीत करण्याकरिता अहवाल वर्षामध्ये **घाटकोपर (पुर्व) व कल्याण (पुर्व)** या ठिकाणी बँकेच्या नवीन शाखांना परवानगी मिळण्याकरीता भारतीय रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

**सभासद संख्या व भागभांडवल :**

गतवर्षी आपल्या बँकेचे ४७८५८ इतके नियमित तर ३७९३ नाममात्र सभासद होते. अहवाल वर्षात ४८८ सभासद निवृत झाले तर १६८० सभासद नव्याने दाखल झाले. वर्षाअखेर आपल्या बँकेचे ४९०५० नियमित तर ३४६० इतके नाममात्र सभासद आहेत. या आकडेवारीवरून बँकेच्या सभासद संख्येत दिवसेंदिवस समाधानकाररित्या वाढ होत असुन बँकेच्या कामकाजातील सभासदांचा वाढता सहभाग हे बँकेच्या विकासाचे तसेच बँकेचा भांडवली पाया मजबुत असल्याचे द्योतक म्हणावे लागेल. **बँकेच्या उपविधीतील सुधारणांनुसार बँकेच्या सर्व सभासदांना सक्रिय सभासदांबाबत करावयाच्या निकषांची पुर्तता करण्याबाबत विनंती करण्या येत आहे.**

आपल्या बँकेच्या अधिकृत भाग भांडवलाची मर्यादा ₹२५.०० कोटी असुन गत वर्षी बँकेचे वसुल भाग भांडवल ₹१८.७७ कोटी इतके होते. अहवाल वर्षात निवृत्त झालेल्या सभासदांना ₹०.८६ कोटी भाग भांडवल परत करण्यात आले. बँकेकडे दाखल झालेल्या नविन सभासदांकडून ₹२.२१ कोटी इतके भाग भांडवल वसुल झाल्याने वर्षाअखेर आपल्या बँकेचे वसुल भाग भांडवल ₹२०.१२ कोटी इतके झालेले आहे. अहवाल वर्षाअखेर बँकेच्या भाग भांडवलात ७.१९% इतकी वाढ झालेली आहे. अहवाल वर्षाचे नक्त नफ्यातुन सभासदांना 10% लाभांश प्रदान करण्याची संचालक मंडळाने शिफारस केलेली आहे.

**राखीव व इतर निधी**

गत वर्षाअखेर आपल्या बँकेचे राखीव व इतर निधी ₹७२.८४ कोटी होते. अहवाल वर्षात सदर निधींमध्ये ₹४.०९ कोटीने वाढ होऊन वर्षाअखेर राखीव व इतर निधी ₹७६.९३ कोटी इतके झालेले आहेत. बँकेने प्राप्त केलेल्या नफ्यातुन संचीत केलेल्या विविध स्वरूपच्या निधींचे प्रमाणावर (Reserves) बँकेचे आर्थिक स्थैर्य अवलंबुन असल्याने बँकेची नफा क्षमता वाढवुन वैधानिक राखीव निधी व इतर निधीत वाढ करण्यासाठी अहवाल वर्षात सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आलेले आहेत. आपल्या बँकेचे भरीव स्वरूपातील राखीव व इतर निधी हे आपली सक्षमता अधोरेखीत करीत असतात. अहवाल वर्षाअखेर आपल्या बँकेचे स्वनिधी (Owned Funds) ₹९७.०५ कोटी इतके असुन नक्त संपत्ती मूल्य (Net Worth) ₹५८.४७ कोटी इतके आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्देशित केल्याप्रमाणे बँकांच्या पर्याप्त भांडवलाचे जोखमीत असलेल्या मालमत्तेशी (CRAR) प्रमाण हे ९% राखणे आवश्यक असताना आपल्या बँकेने वर्षाअखेर हे प्रमाण १७.०३% इतके राखलेले आहे. बँकेने व्यवसायांतर्गत उध्दभवणाऱ्या संभाव्य धोक्यांचे वेळोवेळी योग्यरित्या मुल्यांकन केलेले असून व्यवसायातील संभाव्य धोके टाळण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा निर्माण केलेली आहे.

**ठेवी:**

अहवाल वर्षात ठेवींवरील व्याजदरांबाबत बँकाबँकांत असलेल्या तीव्र स्वरूपाच्या स्पर्धेमुळे त्याचप्रमाणे सर्वसामान्य ठेवीदार हे गुंतवणुकींकरीता म्युच्युअल फंड, स्थावर मालमत्तेची खरेदी आदी पर्याय निवडत असल्यामुळे ठेवी संकलनावर मर्यादा प्राप्त झालेल्या असतांना इतर बँकांत असलेल्या ठेवींवरील व्याजदरांचा साकल्याने अभ्यास करून आपल्या बँक ग्राहकांना मुदत ठेवींवर अधिकाधिक प्रमाणात व्याजदर प्रदान करण्याचे प्रयत्न करण्यात आलेले आहेत. गतवर्षी बँकेकडे सर्व प्रकारच्या ₹६६४.४५ कोटी ठेवी होत्या. अहवाल वर्षात ठेवींमध्ये ₹६८.६७ कोटीने वाढ होऊन त्या वर्षाअखेर ₹७३३.१२ कोटी इतक्या झालेल्या आहेत. अहवाल वर्षात आपल्या बँकेच्या ठेवींमध्ये १०.३३% ने वाढ झालेले आहे. अहवाल वर्षामध्ये आपल्या बँकेने ₹७००.00 कोटी इतक्या ठेवी संकलनाचे उदिष्ठ साध्य केलेले असल्यामुळे नजीकच्या काळात शेड्युल्ड बँकेचा दर्जा प्राप्त करून घेण्याकरीता सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत. अहवाल वर्षातही बँकेने आपल्या जिंदगी-देयतांचे (Assets-Liability Management) सुयोग्य व्यवस्थापन केलेले आहे.

**ठेवी विमा संरक्षण :**

बँकेमार्फत ठेवीदारांचे रूपये एक लाख रकमेपर्यंतच्या सर्व प्रकारच्या ठेवींना ठेवी विमा व पतहमी निगम (DICGC) अंतर्गत विम्याचे संरक्षण देण्यात येते. बँकेने माहे ३० सप्टेंबर, २०१९ अखेरचा ठेवी विम्याचा हप्ता अदा केलेला आहे.

**बाहेरीक कर्जे :**

खातेदारांचे समाशोधन व्यवहारांचे व्यवस्थापनाकरीता बँकेव्दारे सारस्वत सहकारी बँकेकडून मुदत ठेवींचे तारणावर ₹८.५0 कोटी रकमेचे अधिकर्ष कर्ज (Overdraft) मंजूर करण्यात आलेले आहे. वेळोवेळी कर्ज खात्यांतून उचललेल्या रकमांचा संपूर्ण भरणा केलेला असल्याने वर्षाअखेरीस अधिकर्ष कर्जाचे बँकेस दायित्व नाही.

**निधी व्यवस्थापणांतर्गत वैधानिक तरतुद :**

बँकींग अधिनियम १९४९ चे कलम १८ आणि २४ मधील तरतूदींना अधिन राहून बँकेने अहवाल वर्षात वैधानिक स्वरूपात राखावयाची रोखता (CRR) व तरलता(SLR) याबाबतची कटाक्षाने पूर्तता केलेली आहे.

**गुंतवणूक :**

अहवाल वर्षात निधींचे व्यवस्थापनांतर्गत उपलब्ध असलेले अतिरिक्त निधी कर्ज वाटपासाठी तसेच अधिकाधिक परतावा देणाऱ्या बँकांच्या मुदत ठेवींत गुंतविलेले आहेत. गतवर्षी आपल्या बँकेची तरलतेअंतर्गत केंद्र सरकारचे कर्ज रोखे व राज्य सरकारचे कर्ज विकास रोखे यांमधील गुंतवणुक ₹२०८.६५ कोटी होती तर बँकांतर्गत मुदत ठेवींतील गुंतवणुक ₹५६.८0 कोटी इतकी होती. अहवाल वर्षात केंद्र सरकारचे कर्ज रोखे व राज्य सरकारचे कर्ज विकास रोखे यांमधील गुंतवणुक ₹४.0६ कोटीने वाढ झालेली असुन वर्षाअखेर ती ₹२१२.७१ कोटी इतकी झालेली आहे. तर बँकांतर्गत मुदत ठेवींतील गुंतवणुक ही ₹३२.८७ कोटीने वाढ झालेली असुन वर्षाअखेर ती ₹८९.६७ कोटी इतकी झालेली आहे. अहवाल वर्षात सरकारी कर्ज रोखे खरेदी-विक्रीद्वारे बँकेस ₹१.९२ लाख इतका नफा प्राप्त झालेला असुन सरकारी कर्ज रोखे खरेदी-विक्रीच्या व्यवहारांच्या सुलभतेकरीता बँकेद्वारे क्लिअरींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.चे (CCIL) चे सभासदत्व प्राप्त करण्यात आलेले आहे. नजीकच्या कालावधीत भारतीय रिझर्व्ह बँकेकडून Negotiated Dealing System -OMS चे सभासदत्व प्राप्त करून त्याचप्रमाणे सरकारी कर्ज रोखे खरेदी विक्रीचे थेट स्वरूपात व्यवहार करून बँकेच्या नफा क्षमतेत वाढ करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत.

**कर्जव्यवहार :**

अहवाल वर्षात कर्जांवरील व्याजदरांबाबत तिव्र स्पर्धा असतांना आपल्या बँकेने सुरक्षित व किरकोळ स्वरूपाची कर्जे वितरीत करून कर्ज व्यवहारांत समाधानकारकरित्या वाढ केलली आहे. गतवर्षी बँकेने वाटप केलेल्या कर्जापैकी ₹४४५.५८ कोटी इतकी कर्जे येणे बाकी होती. त्यात ₹३0.५३ कोटीने वाढ होऊन अहवाल वर्षाअखरे एकूण कर्ज येणे बाकी ₹४७६.११ कोटी इतकी आहेत. अहवाल वर्षाअखेर बँकेचे येणे असलेल्या कर्जांचे

ठेवींशी गुणोत्तर (CD Ratio) ६४.९४% असल्याने बँकेने ठेवीदारांच्या ठेवींचे सुयोग्य व्यवस्थापन केलेले असल्याचे दिसून येते. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देशांनुसार आपल्या बँकेने अग्रगण्य घटकांस ७०.८७% तर दुर्बल घटकांस १३.०४% कर्जे वितरीत केलेली आहेत.

**कर्ज थकबाकी व अनुत्पादित कर्जे व्यवस्थापन :**

अहवाल वर्षाअखेर बँकेला येणे असलेल्या कर्जापैकी ६.४७% कर्जे थकीत आहेत. तर एकूण कर्ज रकमेपैकी ₹३२.५१ कोटी कर्जे ढोबळ अनुत्पादित कर्जे (Gross NPAs) म्हणून वर्गीकृत करण्यात आलेली आहेत. आपल्या बँकेने उत्पादित तसेच अनुत्पादित कर्जासाठी अतिरिक्त स्वरूपात तरतूदी केलेल्या असल्याने बँकेची निव्वळ अनुत्पादित कर्जे (Net NPAs) २.६२% इतकी आहेत. अहवाल वर्षात बँकेचे संचालक मंडळ सदस्य, अधिकारी व कर्मचारी वर्गाने कर्ज थकबाकी वसुलीस सर्वोच्च प्राधान्य देत अनुत्पादित कर्ज वाढीवर समाधानकारकरित्या नियंत्रण राखलेले आहे. कर्जदारांना आपल्या कर्जांचे हप्ते नियमित भरणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

**संशयित व बुडीत कर्जांचे निर्लेखीकरण :**

बँकेच्या एकुण १६६ जुन्या अनुत्पादित कर्ज खात्यांवरील येणे रकमांपोटी कर्जे वसुलीबाबत बँकेच्या वसुली विभागाद्वारे सर्वतोपरी प्रयत्न करून तसेच कायदेशीर कारवाई करूनही कर्जे वसुल होऊ शकलेली नाहीत. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देशांनुसार अशा अनुत्पादित कर्जाच्या येणे रकमांपोटी १००% तरतुद केलेली असुन सदर थकित कर्जे वसुल करण्यासाठी होणारे वसुली खर्च, अन्य प्रशासकीय खर्च यांमध्ये बचत करणे, बँकेचा ताळेबंद स्वच्छ करून तो सत्यस्थिती दर्शक करणे, आर्थिक गुणोत्तरे सुधारणे तसेच करपात्र उत्पन्नानुसार करबचतीचा लाभ घेणे आदी बाबींकरीता बँकेच्या संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे व वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणीत केल्यानुसार अशा अनुत्पादित कर्ज खात्यांवरील येणे शिल्लक रक्कम ₹९८,१६,१९५.४२ व त्यावरील येणे व्याज ₹१,६४,०६,९१०.५० अशी एकुण ₹२,६२,२३,१०५.९२ रक्कम सदर कर्जदार यांचेकडुन वसुली बाबतचे सर्व अधिकार अबाधित राखुन निर्लेखित करण्याबाबत निर्णयाचे अधिकार बँकेच्या संचालक मंडळास प्रदान करण्यारीता मा.वार्षिक सर्वसाधारण सभेने मान्यता देण्याकरीता विनंती करण्यात येत आहे. सदर कर्जे निर्लेखिकरण प्रक्रियेचे स्वरूप हे कर्ज माफीस्वरूपाचे नसुन सदर अनुत्पादित कर्जांची पुर्णतः वसुली झाल्याशिवाय कर्जदारांना कर्ज बंद झाल्याचे प्रमाणपत्र (No Dues Certificate) दिले जाणार नसल्याने सदर प्रक्रिया ही केवळ लेखी नोंदीच्या (Accountings Standards) पध्दतीस अधिन राहुन करण्यात येत आहे.

**खेळते भांडवल :**

गतवर्षी आपल्या बँकेचे खेळते भांडवल ₹८०६.२४ कोटी इतके होते . अहवाल वर्षात त्यात ₹७१.३३ कोटीने वाढ होऊन वर्षाअखेर ते ₹८७७.५७ कोटी झालेले आहे. अहवाल वर्षातील खेळत्या भांडवलातील वाढ ही प्रामुख्याने बँकेच्या ठेवींमध्ये झालेली वाढ आदी बाबींमुळे झालेली असुन आगामी कालावधीत बँकेच्या व्यवसाय वाढीकरीता सर्वतोपरी प्रयत्न करून खेळत्या भांडवलामध्ये समाधानकारक वाढ केली जाणार आहे.

**संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांचे कर्जे :**

संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना बँकेमार्फत मंजूर करावयाच्या कर्जांवर भारतीय रिझर्व्ह बँकेचे निर्बंध असल्यामुळे अहवाल वर्षात अशी कर्जे वितरीत करण्यात आलेली नाहीत. तथापि, वैधानिक स्वरूपात सादर कराव्या लागणाऱ्या माहितीपत्रकात संचालक मंडळात नव्याने निवडुन आलेल्या सदस्यांनी व त्यांचे नातेवाईंकांनी बँकेकडून संचालक मंडळाचे निवडणूकीपुर्वी घेतलेली कर्जे संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांची कर्जे वर्षा अखेर येणे म्हणुन दाखविणे अभिप्रेत असते. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांची दि. ३१.०३.२०१९ अखेर कर्ज येणे बाकी ही निरंक आहेत.

**संचालक मंडळ व समित्या सभा :**

बँकेच्या संचालक मंडळात आर्थिक, सामाजिक, कामगार व औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेले सदस्य असून त्यांच्यात असलेला व्यावसायिक दृष्टीकोन व दुरदर्शीपणा बँकेच्या सर्वांगीण विकासात महत्वपूर्ण भूमिका

बजावत असतो. अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या २१ सभा घेण्यात आल्या. या सर्व सभांना संचालकांची उपस्थिती समाधानकारक राहिलेली आहे. बँकेचे सर्व संचालक सदस्य सभासद, ग्राहक व कर्मचारी वर्गास सदैव मार्गदर्शन करतात व बँकेच्या कामकाजात सहभागी होऊन कामकाजात गतिमानता राखण्याचे प्रयत्न करतात. बँकेतील विविध विभागाचे कामकाज जलदगतीने व सुलभतेने होण्यासाठी संचालक मंडळातंर्गत असलेली कर्ज मंजुरी समिती. कार्यकारी समिती, ऑडीट समिती, वसुली समिती, गुंतवणूक समिती, संगणक समिती, एकरकमी तडजोडीने कर्ज वसुली समिती यांच्या वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या सभानांही समिती सदस्यांची उपस्थिती समाधानकारक राहीलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संचालकांचे नाव | संचालक सभा | उपसमित्या सभा | एकूण सभा | उपस्थिती | उपस्थितीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.चंद्रकांत रावसाहेब गावडे | २१ | ३८ | ५९ | ५८ | ९८.३१% |
| २ | श्री.प्रकाश जगन्नाथ मस्कर | २१ | ३३ | ५४ | ४९ | ९०.७४% |
| ३ | श्री.विक्रम विजयकुमार भिलारे | २१ | ४१ | ६२ | ५७ | ९१.९४% |
| ४ | डॉ.शैलेश दत्तात्रय जाधव | २१ | ६ | २७ | २२ | ८१.४८% |
| ५ | श्री.राजाराम शंकर ओंबळे | २१ | २५ | ४६ | ३५ | ७६.०९% |
| ६ | श्री.आनंदराव जोतिबा सपकाळ | २१ | १३ | ३४ | ३१ | ९१.१८% |
| ७ | श्री.भरत राजाराम सपकाळ | २१ | ५ | २६ | २३ | ८८.४६% |
| ८ | श्री.भानुदास महादेव जाधव(पार्टे) | २१ | ३ | २४ | २३ | ९५.८३% |
| ९ | श्री.संतोष रामचंद्र कळंबे | २१ | ११ | ३२ | २९ | ९०.६३% |
| १० | श्री.बजरंग कोंडिबा संकपाळ | २१ | १३ | ३४ | ३० | ८८.२४% |
| ११ | श्री.शिवाजी श्रीपती नवसरे | २१ | ९ | ३० | २९ | ९६.९७% |

| अ.क्र. | संचालकांचे नाव | संचालक सभा | उपसमित्या सभा | एकूण सभा | उपस्थिती | उपस्थितीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | श्री.मोहद ज्ञानदेव मानकुमरे (दि.२७/१२/२०१८ पासून) | ५ | ० | ५ | ५ | १००.००% |
| १३ | श्री.श्रीरंग भागू सपकाळ | २१ | ४ | २५ | २५ | १००.००% |
| १४ | श्री.हणमंत गणपत पवार | २१ | ५ | २६ | २३ | ८८.४६% |
| १५ | श्री.प्रकाश उर्फ चंद्रकांत धोंडिराम कोकरे | २१ | १२ | ३३ | २४ | ७२.७३% |
| १६ | सौ.पवित्रा राजाराम परामणे | २१ | ९ | ३० | २४ | ८०.००% |
| १७ | सौ.अस्मिता विजय धनावडे | २१ | १४ | ३५ | ३२ | ९१.४३% |
| १८ | ॲड.शिवाजीराव साहेबराव मर्ढेकर | २१ | ५ | २६ | १७ | ६५.३८% |
| १९ | श्री.चंद्रकांत सुदाम पवार | २१ | ६ | २७ | २४ | ८८.८९% |
| २० | श्री.दत्ता नारायण कळंबे | २१ | २ | २३ | १७ | ७३.९१% |
| २१ | श्री.एकनाथ बाबुराव ओंबळे | २१ | ४ | २५ | २२ | ८८.००% |

## संचालक व स्विकृत संचालकांची नियुक्ती:

बँकेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण गटातील रिक्त असलेल्या एका जागेवर दि.२७/१२/२०१८ पासुन **श्री मोहन ज्ञानदेव मानकुमरे** यांची बँकेच्या संचालकपदी निवड करण्यात आलेली आहे. बँकेच्या उपविधीचे कलम क्र.३९ नुसार दि.३०.०४.२०१९ पासुन ॲड. शिवाजीराव साहेबराव मर्ढेकर व श्री. चंद्रकांत सुदाम पवार यांची स्विकृत संचालक म्हणुन संचालक मंडळावर फेरनियुक्ती करण्यात आलेली आहे.

## कर्मचारी वृंद व प्रशिक्षण :

बँकेच्या सातत्यपुर्ण प्रगतीमध्ये कर्मचारी वर्गाचा सहभाग उल्लेखणीय असा राहिलेला आहे. बँक व्यवस्थापन व कर्मचारी वर्ग यांचेत कायमस्वरूपी सलोख्याचे व सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित आहेत. अहवाल वर्षात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे कुशल तसेच प्रशिक्षित कर्मचारी वर्गाचे माध्यमातुन बँकेने ग्राहकाभिमुख सेवा-सुविधा प्रदान करण्याचे प्रयत्न साधण्यात आलेले आहेत. अहवाल वर्षाअखेर बँकेच्या सेवेत सर्व श्रेणीचे २१९ कर्मचारी कार्यरत आहेत. बँकेने रिझर्व्ह बँक (CAB) पुणे, यशदा-पुणे, सहकार खाते, बँक्स असोसिएशन यांनी आयोजित केलेल्या विविध कार्यशाळांना विविध श्रेणीच्या कर्मचाऱ्यांना पाठविले होते. त्याचप्रमाणे बँकेच्या दादर शाखेत कार्यान्वीत असलेल्या कर्मचारी प्रशिक्षण केंद्राव्दारे वेळोवळी सहकारी बँकींग व्यवसायातील तज्ञांची व्याख्याने आयोजित करून समस्त कर्मचारी वर्गास कार्यतत्पर करण्याचे प्रयत्न साधण्यात आले आहेत. अहवाल वर्षामध्ये बँकेचे संचालक मंडळ सदस्य आणि समस्त कर्मचारी वृंद यांच्यातील सकारात्मक दृष्टीकोन विकसीत करणे आणि बँकेच्या व्यवसाय वाढीकरीता प्रोत्साहीत करण्याच्या उद्देशाने दि.१३/१०/२०१८ रोजी वाशी, नवी मुंबई येथे मान्यवरांची व्याख्याने व संयुक्त मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर मेळाव्यामध्ये बँकेच्या व्यवसाय वाढीमध्ये उपयुक्त स्वरूपाचे योगदान प्रदान करणाऱ्या शाखा, आजी-माजी संचालक सदस्य, बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांचा उचीत स्वरूपात गौरव करण्यात आलेला आहे.

## भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत तपासणी :

बँकिंग नियंत्रण अधिनियम, १९४९ च्या कलम ३५ अन्वये (सहकारी बँकांना लागू असणारा) भारतीय रिझर्व्ह बँक, शहरी बँका विभागामार्फत आपल्या बँकेच्या माहे १ एप्रिल, २०१७ ते ३१ मार्च, २०१९ या द्वैवार्षिक कालावधीच्या तपासणीचे काम लवकरच सुरू केले जाणार आहे.

**वैधानिक लेखा परिक्षण :**

दि. ५ ऑगस्ट, २०१८ रोजी झालेल्या बँकेच्या ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेव्दारे सन २०१८-१९ चे वैधानिक लेखा परिक्षणासाठी अधिकृत सनदी लेखापालांचे सुचीमधुन मे. गोन्सालविस ॲन्ड असोसिएटस् या चार्टर्ड अकौंटट फर्मची नेमणूक करण्यात आलेली होती. मा.वैधानिक लेखी परिक्षकांनी लेखापरिक्षणाचे काम पूर्ण करून बँकेस अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवाल आपल्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला असुन मा.वैधानिक लेखा परिक्षकांनी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी आपल्या बँकेस '**अ ऑडीट वर्ग**' प्रदान केलेला आहे.

**समावर्ती लेखा परिक्षण/टॅक्स ऑडिट व माहिती तंत्रज्ञान लेखापरिक्षण :**

सन २०१८-१९ या वर्षाच्या बँकेच्या समावर्ती लेखा परिक्षणाचे (Concurrent Audit) काम मे.दिनेश आहिर ॲन्ड कं., एस ए मोरे ॲन्ड कं., मे तेजस नाडकर्णी ॲन्ड असोसिएटस्, मे ऋषीकेश वांगडे असोसिएटस्, मे. किरण भोसले ॲन्ड कं., व मे नितीन दळवी ॲन्ड कं., टॅक्स ऑडीटचे काम मे व्ही.आर.समदारीया ॲन्ड क. लि., तर माहीती तंत्रज्ञान लेखापरीक्षाणाचे (IS Audit) काम मे.मार्क ॲन्ड असोसिएटस् या चार्टर्ड अकौंटट फर्मस्नी पुर्ण केलेले आहे. विविध स्वरूपाचे लेखा परिक्षण करणाऱ्या सर्व फर्मस्नी आपल्या बँकेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केलेले असुन अहवालाव्दारे बँकेस उपयुक्त स्वरूपाच्या सुचना व मार्गदर्शन केलेले आहे.

**नफा विभागणी :**

माहे ३१ मार्च, २०१९ या वर्षाअखेर ₹५,१२,२७,०३७.९० इतका निव्वळ नफा विभागणीस शिल्लक आहे. सदर नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे करण्यास संचालक मंडळ शिफारस करीत आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | वैधानिक राखीव निधी (Statutory Reserve Fund) २५% प्रमाणे | १,२८,०६,७६०.०० |
| २ | विशेष राखीव निधी (Special Statutory Reserve Fund) १० % प्रमाणे | ५१,२२,७०४.०० |
| ३ | लाभांश – (Dividend ) १० % प्रमाणे | १,६८,३७,८३४.०० |
| ४ | संचालक मंडळ निवडणूक खर्च निधी (BOD Election Expenses Fund) | १०,००,०००.०० |
| ५ | संचालक, सभासद, कर्मचारी प्रशिक्षण निधी (Directors, Member & Employees Training Fund) | १०,००,०००.०० |
| ६ | गुंतवणूक चढ–उतार निधी (Investment Fluctuation Reserve) | ५०,००,०००.०० |
| ७ | तंत्रज्ञान विकास निधी (Technology Development Fund) | २५,००,०००.०० |
| ८ | विकास निधी (Development Fund) | १०,००,०००.०० |
| ९ | सुवर्ण महोत्सव निधी (Golden Jubilee Fund) | ५,००,०००.०० |
| १० | लाभांश संतुलन निधी (Dividend Eqalisation Fund) | ५,००,०००.०० |
| ११ | धर्मादाय निधी (Charity Fund) | ७,००,०००.०० |
| १२ | सभासद कल्याण निधी (Members Welfare Fund) | ५,००,०००.०० |
| १३ | बँक संस्थापक वै.ह.भ.प. दत्तात्रय महाराज कळंबे कार्य प्रसार निधी (Bank's Founder Late Hon Dattatraya Maharaj Kalambe Benevolence Fund) | ३२,००,०००.०० |
| १४ | इमारत निधी (Building Fund) | ५,५९,७३९.९० |
| | **एकूण** | **५,१२,२७,०३७.९०** |

अहवाल वर्षामध्ये ह.भ.प.वै.दत्तात्रय महाराज कळंबे यांच्या वैकुंठगमना नंतर त्यांचे प्रदिर्घ कालावधीकरीता वास्तव्य राहीलेल्या जावली तालुक्यातील बेलोशी गावामध्ये असलेल्या समाधी मंदिराचे व परीसराचे नुतनीकरण त्याचप्रमाणे सुशोभिकरण करण्यात आलेले असून सदर कामाकरिता बँकेच्या वतीने करण्यात आलेला खर्च हा वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने बँक संस्थापक वै.ह.भ.प.दत्तात्रय महाराज कळंबे कार्यप्रसार निधीअंतर्गत निर्लेखित करण्यात येणार आहे. उपरोक्त नफा विभागणीस मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी विनंती करण्यात येत आहे.

**भावपुर्ण श्रध्दांजली :**

अहवाल वर्षामध्ये जम्मु-काश्मीर मधील पुलवामा येथील आंतकवादी हल्ल्यात शहीद झालेले **केंद्रीय राखीव पोलीस दलाचे जवान,** गडचिरोली येथील नक्षलवादी भुसुरूंग स्फोटात शहीद झालेले **पोलिस दलातील जवान,** भारताचे माजी पंतप्रधान व प्रभावी वक्ते **मा.अटलबिहारी वाजपेयी,** सातारा जिल्ह्याचे जेष्ठ नेते माजी खासदार **मा.लक्ष्मणराव पाटील,** माजी केंद्रीय मंत्री कामगार नेते **मा.जॉर्ज फर्नांडिस,** वै.ह.भ.प. दत्तात्रय महाराज कळंबे यांचे अनुयायी गुरूवर्य **ह.भ.प.गुलाबबाबा वाईकर,** बँकचे माजी संचालक **मा.जयसिंग विठ्ठल चिकणे** यांना काळाने आपल्यातुन हिरावुन नेलेले आहे. त्याचप्रमाणे अहवाल वर्षामध्ये बँकेचे जे ज्ञात-अज्ञात सभासद, खातेदार, हितचिंतक, संचालक व कर्मचारी वर्गाचे नातेवाईक यांचे दुःखद निधन झालेले आहे त्या सर्वाच्या कुटुंबियांच्या दुःखात आपला जावली बँक परिवार सहभागी असुन दिवंगतांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना करण्यात येत आहे.

**अभिनंदनिय निवड :**

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीत आपल्या सातारा जिल्ह्याचे सुपुत्र **मा.श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले** यांची सातारा लोकसभा मतदार संघातुन, **मा.डॉ.श्रीकांत शिंदे** यांची कल्याण लोकसभा मतदारसंघातुन खासदारपदी फेर निवड तर **मा.सौ.जयश्री गिरी** यांची पंचायत समिती जावली सभापती पदी निवड झालेली आहे. या सर्वांचा बँकेला अभिमान असुन बँकेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य माध्यमिक,उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विविध विभागीय मंडळामार्फत घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षा, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा, राज्य शासनाने घेतलेल्या विविध शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यापिठांमार्फत घेण्यात आलेल्या पदवी, पदविका व पदवीत्तर परीक्षा, शासनाच्या तंत्र शिक्षण विभागामार्फत घेण्यात आलेल्या विविध अभियांत्रीकी परीक्षा, वैद्यकिय परीक्षा, व्यवस्थापकिय परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल तसेच शासनाचे पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल बँकेचे सभासद, ग्राहक, खातेदार, हितचिंतक तसेच त्यांची पाल्य या सर्वांचे बँकेच्या वतीने विशेष अभिनंदन करण्यात येत आहे.

**आभार आणि ऋणनिर्देश:**
**अहवाल वर्षात**

**मा. श्री.शरदचंद्रजी पवार**
माजी केंद्रीय कृषी आणि अन्न प्रक्रिया मंत्री

**मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. ना. श्री. एकनाथ शिंदे**
शिवसेना नेते व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) व आरोग्य मंत्री , महाराष्ट्र राज्य

**मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील**
महसुल व सार्वजनीक बांधकाम विभाग मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. ना. श्री. सुभाष सु.देशमुख**
सहकार पणन व वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले**
खासदार- सातारा
संचालक - सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.

**मा. श्री. आनंदराव अडसूळ**
मा.केंद्रीय अर्थराज्य मंत्री, मा.खासदार - अमरावती
अध्यक्ष - को.ऑप.बँक एम्प्लॉईज युनियन, मुंबई

**मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर**
सभापती-विधान परिषद, महाराष्ट्र राज्य

**मा. श्री. शशिकांत शिंदे**
आमदार-कोरेगाव, संचालक-सातारा जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि. व माजी जलसंपदा मंत्री (कृष्णा खोरे) महाराष्ट्र राज्य

**मा. श्री. नरेंद्र पाटील**
सरचिटणीस-माथाडी कामगार युनियन,
अध्यक्ष-आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ,
महाराष्ट्र राज्य

**मा. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले**
आमदार-सातारा-जावली,
अध्यक्ष-सातारा जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि.

**मा. श्री. मकरंद पाटील (आबा)**
आमदार-वाई-महाबळेश्वर-खंडाळा

**मा. श्रीमंत संजीवराजे नाईक निबांळकर**
अध्यक्ष-सातारा जिल्हा परिषद

**मा. श्री. वसंतराव मानकुमरे**
उपाध्यक्ष-सातारा जिल्हा परिषद
संचालक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक

**मा. श्री. सदाशिवभाऊ सपकाळ**
मा. आमदार-जावली

**मा. श्री. बाळासाहेब भिलारे**
मा. उपाध्यक्ष, सातारा जिल्हा परिषद

**मा. श्री. राजेंद्रशेठ राजपुरे**
संचालक - सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.

**यांचे बँकेला सहकार्य व अमुल्य मार्गदर्शन लाभले आहे. या सर्वांची बँक ऋणी असून बँकेच्या वतीने सर्वांचे आभार मानन्यात येत आहेत.**

**विशेष आभार :**

बँकेच्या सक्रिय कारभारात सातत्यपुर्ण सहभाग लाभत असलेले आपल्या बँकेचे माजी अध्यक्ष/उपाध्यक्ष मा.श्री.दत्तात्रय जाधव, श्री.यशवंतराव देशमुख, श्री.हिंदुराव तरडे, श्री.विठ्ठलराव देशमुख, श्री.योगेश गोळे, श्री.सिताराम निकम, श्री.लक्ष्मण धनावडे, श्री.महादेव मांढरे, श्री.राजेंद्र कळंबे, श्री.अरूण सुर्वे, माजी संचालक श्री.बाबुराव इथापे, श्री.तुकाराम घाडगे, श्री.मानसिंगराव मर्ढेकर, ॲड. श्री.रामचंद्र जवळ, श्री.साहेबराव नवले, श्री.वसंतराव माने, सौ.स्मिता माने, सौ.पार्वती सावंत, श्री.बापुराव भोसले, श्री.सुरेंद्रभाई पारेख, श्री.विनायकराव रांजणे, श्री.भगवानराव धनावडे, श्री.अशोकराव जाधव, श्री.तानाजी भगत, सौ.प्रतिभा सपकाळ, श्री.सुभाषराव कदम, श्री.चंद्रकांत दळवी, श्री.पांडुरंग जवळ, श्री.विश्वनाथ कांबळे, श्री.शकंरराव साळुंखे, श्री.विलास कांबळे, श्रीमती संगीता देशमुख, सौ.शोभा रांजणे, श्री.विनोद कळंबे , श्री.संजय चौधरी यांचे बँकेच्या वतीने आभार मानन्यात येत आहेत.

अहवाल वर्षात भारतीय रिझर्व्ह बँक, क्लिअरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि., बृहन्मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊस, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, मा.अप्पर आंयुक्त व विषेश निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे विभागीय सह निबंधक, नवीमुंबई जिल्हा उपनिबंधक,मुंबई जिल्हाधिकारी मुंबई शहर, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि., महाराष्ट्र स्टेट को.ऑप बँक्स असोसिएशन, महाराष्ट्र अर्बन को.ऑप.बँक्स फेडरेशन लि., बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, मुंबई सहकारी बोर्ड, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडियन बँक्स असोसिएशन, नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि., क्रेडिट इन्फोर्मेशन ब्युरो (इंडिया) लि., इक्विफॅक्स क्रेडिट इन्फोर्मेशन सर्व्हिसेस प्रा.लि., या सर्व संस्थांचे अधिकारी/पदाधिकारी, सातारा जिल्ह्यातील सर्व सहकारी पतसंस्था व विविध मंडळे, वैधानिक हिशेब तपासणीस कंकरंट हिशेब तपासणीस, बँकेच्या शाखा परिसरातील सर्व पोलिस ठाणे, विविध वृत्तपत्रे, तसेच को-ऑप बँक एम्पलॉइज युनियन मुंबई,बँकेच्या पॅनलवरील सर्व कायदेविषयक सल्लागार, सर्व्हेअर्स, सातारा जिल्हा परिषदेचे समस्त सदस्य, सातारा जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांचे सभापती, उपसभापती व सदस्य, सातारा जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच व सदस्य, सामाजिक कार्यकर्ते यांचेही बहुमुल्य मार्गदर्शन व सहकार्य लाभलेले आहे. या सर्वांचे बँकेच्या वतीने आभार !

अहवाल वर्षात न्यु सातारा जिल्हा नागरिक सहकारी पतसंस्था मर्यादित, ज्ञानदिप को-ऑप क्रेडिट सोसायटी

लि., श्री कुलस्वामी को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., पुष्पक को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., शिवकृपा सहकारी पतपेढी लि., उत्कर्ष नागरी सहकारी पतसंस्था लि., श्री विठ्ठल रूक्मीनी सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई नागरिक सहकारी पतसंस्था मर्यादित, नवयुग विकास नागरी सहकारी पतपेढी., कमल महिला नागरी सहकारी पतपेढी लि., पारीजात को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., वेन्ना निरंजन सहकारी पतंसंस्था मर्यादित, सांगली वैभव को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., शिवज्योती सहकारी पतपेढी मर्यादित, अभयलक्ष्मी को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., खंडाळा सन्मित्र को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., सातारा जिल्हा नागरिक सहकारी पतसंस्था मर्यादित,छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्था मर्यादित, आदर्श ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था, लेन्याद्री सहकारी पतपेढी लि., यश पॅराडाईज को-ऑप हौ. सोसायटी लि., चंद्रप्रभा को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., जावली सहकारी पतपेढी मर्यादित, आशिर्वाद को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., कालभैरवनाथ सहकारी पतसंस्था मर्यादित, युवा उत्कर्ष को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., उत्कर्ष को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., महानगर व्यापारी नागरिक सहकारी पतसंस्था मर्यादित, वै.ह.भ.प.दत्तात्रय महाराज कळंबे को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. , जयमहाराष्ट्र को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., श्री भैरवनाथ को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., सुप्रभा सहकारी पतसंस्था मर्यादित, जगन्नाथ को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., शिवशक्ती मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., समाजकल्याण सहकारी पतपेढी मर्यादित, ज्ञानगंगा सहकारी पतसंस्था लि., गणेश स्वामी समर्थ सहकारी पतसंस्था लि., श्री गणेश नागरिक सहकारी पतसंस्था मर्यादित, कांता सुरेंद्र को-ऑप हौ.सोसायटी लि., गणराज सहकारी पतसंस्था लि., पंचगंगा सहकारी पतपेढी मर्यादित, शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित, सहयोग को-ऑप सोसायटी लि., यशोमंदिर सहकारी पतपेढी मर्यादित, पारेख अपार्टमेंट को-ऑप हौ.सोसायटी लि., सर्वोदय को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. या सर्व पतसंस्था व इतर पतसंस्था, पतसंस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व पदाधिकारी यांनी आपल्या बँकेवर विश्‍वास दाखवून बँकेत आपापल्या संस्थांची भरीव स्वरूपात गुंतवणुक केली असुन बँकेच्या वतीने विशेष आभार मानन्यात येत आहेत.

माझे सर्व सहकारी, संचालक सदस्य, बँकेच्या सेवेत कार्यरत असणारा अधिकारी व कर्मचारी वर्ग, आपणासारखे सन्माननीय सभासद, खातेदार, ठेवीदार कर्जदार हितचिंतक यांच्या महत्वपुर्ण योगदानातूनच बँकेचा सदैव विकास घडत असल्याने सर्वांचे मन:पुर्वक आभार !

**सभासदांना विनंती :**

आपणा सर्वांचे बँकेस कायमस्वरूपी सहकार्य लाभत असते. आपणाकडून प्राप्त होणाऱ्या विधायक स्वरूपाच्या सुचनांमुळे बँकेच्या विकासाच्या योजना राबविणे आम्हास शक्य होत असते. आम्ही सदैव आपण आमच्यावर टाकलेल्या विश्वासास पात्र ठरण्यासाठी प्रयत्न करत असतो. आपला आमच्यावर असलेला विश्‍वास असाच वृध्दींगत करणेसाठी विनम्र अवाहन करण्यात येत असुन वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणीत केलेला आपल्या बँकेचा ३१ मार्च, २०१९ अखरेचा ताळेबंद, नफा तोटा पत्रक, वैधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल आणि संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा विनियोजनास मान्यता देण्यासाठी आपणास नम्र विनंती करण्यात येत आहे.

धन्यवाद !

**“जय हिंद, जय सहकार”**
**संचालक मंडळाच्या वतीने**

# INDEPENDENT AUDITOR'S REPORT
# FOR THE YEAR ENDED 31ST MARCH, 2019

**(As required under section 81 (5B) of The Maharashtra Co-Operative Societies Act, 1960 and Rule 69(3) of MCS Rules, 1961 (as applicable to Co-Operative Societies)**

**To**
**The Shareholders,**
**Dattatraya Maharaj Kalambe Jaoli Sahakari Bank Ltd.**
Regd. Office: 418/20, Maulana Azad Road, Mumbai-400 004

**Ref:-Appointment Letter Ref.No.DMKJSBL/Accounts & Fin/09/036/2018-19 dated 01.09.2018**

## Report on the Financial Statements, as a Statutory Auditor.

1. We have audited the accompanying financial statements of **The Dattatraya Maharaj Kalambe Jaoli Sahakari Bank Ltd.** ('the Bank') as at 31st March 2019, which comprise the **Balance Sheet as at 31 March 2019**, and the **Profit and Loss Account**, and the **Cash Flow Statement** for the year then ended, and a summary of significant accounting policies and other explanatory information. The returns of 24 branches audited by us are incorporated in these financial statements.

## Management's Responsibility for the Financial Statements

2. Management is responsible for the preparation of these financial statements that give a true and fair view of the financial position, financial performance and cash flow of the Bank in accordance with the Banking Regulation Act, 1949 (as applicable to co-operative societies), the guidelines issued by the Reserve Bank of India and the guidelines issued by the Registrar of Co-operative Societies, Maharashtra, the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, and the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961, (as applicable) and generally accepted accounting principles in India so far as applicable to the Bank. This responsibility includes design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

## Auditor's Responsibility

3. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with Standards on Auditing issued by the Institute of Chartered Accountants of India. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatements.
4. An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgement, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the Bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances, but not for the purpose of expressing an opinion on effectiveness of the Bank's internal control. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.

5. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion.

**Opinion**

6. In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the aforesaid financial statements together with the Notes thereon give the information required by the Banking Regulation Act, 1949 (as applicable to co-operative societies), the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961 and guidelines issued by Reserve Bank of India and Registrar of Co-operative Societies, Maharashtra in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:

(a)In the case of the **Balance Sheet**, of **state of affairs** of the Bank as at **31st March 2019**;
(b)In the case of the **Profit and Loss Account**, of the **Profit** for the year ended on that date; and
(c)In the case of the **Cash Flow Statement**, of the **cash flows** for the year ended on that date.

**Report on Other Legal & Regulatory Requirements**

7. The Balance Sheet and the Profit and Loss Account have been drawn up in Forms "A" and "B" respectively of the Third Schedule to the Banking Regulation Act, 1949 and provisions of the Maharashtra Co operative Societies Act, 1960 and the Maharashtra Co operative Societies Rules 1961.

8. We report that:

a)We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit and have found to be satisfactory;
b)In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as it appears from our examination of those books and proper returns adequate for the purposes of our audit have been received from the branches/offices;
c)The transactions of the Bank which have come to our notice are within the powers of the Bank;
d)The Balance Sheet and the Profit and Loss Account dealt with by this report, are in agreement with the books of account and the returns;
e)The accounting standards adopted by the Bank are consistent with those laid down by accounting principles generally accepted in India so far as applicable to Banks.

9. The details as required by the Rule 69(6) of Maharashtra Co operative Societies Rules, 1961 are given in the audit memorandum separately.

10. We further report that for the year under audit, the Bank has been awarded **"A" classification.**

**FOR M/s. GONSALVES & ASSOCIATES**
**CHARTERED ACCOUNTANTS**
**FRN: 103293 W**

**(GLEN R.GONSALVES)**
**PROPRIETOR**
**M. NO: 43150**

**Date: 21.05.2019**
**Place: Mumbai**